Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं//परीक्षा/ 1985
दिनांक : 22 MAY 2025

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) पुरवणी परीक्षा जून-जुलै 2025 साठी विद्यार्थ्यांचे नियमित व विलंब शुल्काव्दारे ऑनलाईन आवेदनपत्र शुल्क चलन आणि इतर कागदपत्रे जमा करणेबाबत..**

**संदर्भ** :- या कार्यालयाचे क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/1512 दि.06/05/2025 रोजीचे परिपत्रक

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2025 च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्काव्दारे ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा संदर्भिय परिपत्रकाव्दारे कळविण्यात आलेली आहे.

कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन SUBMIT केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज लॉगिन (College Login) मधून Pre-List उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टर नुसार पडताळून ती अचूक असल्याची खात्री करावी. सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्याचप्रमाणे पडताळणी केलेबाबत उच्च माध्यमिक शाळा प्रमुख/ प्राचार्य यांनी प्रिलिस्टच्या प्रत्येक पानावर शिक्क्यासह स्वाक्षरी करावी.

सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाच्या अधिकृत Website व्दारे प्राप्त Online चलनावर नमूद केलेल्या ICICI बँकेच्या Virtual Account मध्ये कोणत्याही बँकेमधून NEFT/ RTGS व्दारे चलनाप्रमाणे अचूक शुल्क रकमेचा भरणा करण्यात यावा. यापूर्वी वापरात असणाऱ्या Bank Of India च्या जुन्या चलनांचा वापर करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे मंडळात रोख स्वरुपात शुल्क स्विकारले जाणार नाही.

नियमित आणि विलंब शुल्काव्दारे ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांची व प्राचार्यांची स्वाक्षरी असलेली प्रिलिस्ट, NEFT/ RTGS व्दारे शुल्क भरणा केलेल्या चलनाची प्रत, फी डिटेल्स व विद्यार्थ्यांच्या याद्या (Excel यादी), तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत **सोमवार**, **दि.26/05/2025 रोजी जिल्हा वितरण केंद्रावर सकाळी** 11.00 **ते सायंकाळी 4.00 या वेळेत** सादर कराव्यात.

अतिविलंब शुल्काव्दारे ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांची नावे या Excel यादी मध्ये नमूद करु नयेत तसेच सदर विद्यार्थ्यांबाबत स्वतंत्र परिपत्रकाव्दारे सूचना कळविण्यात येत आहेत, त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**